महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित
दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

**संदर्भ: मा. सं/ जनसंपर्क/ प्रेस नोट/ २४**

# महानिर्मितीतर्फे गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांचा सत्कार

नुकत्याच जाहीर झालेल्या उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत उत्तुंग यश प्राप्त करुन गुणवत्तायादीत झळकलेल्या **चि. हर्षल प्रकाश चव्हाण आणि चि. बाबासाहेब दिवेकर** या गुणवंत विद्यार्थ्यांचा महानिर्मितीतर्फे नुकताच प्रकाशगड मुख्यालय येथे भव्य सत्कार करण्यात आला.

यावेळी मुंबई विभागात (व्यवसायिक शाखा) मध्ये ९६.६७% गुण मिळवून सर्वप्रथम आलेला चि. हर्षल चव्हाण व औरंगाबाद विभागात ९३.१७% गुण मिळवून गुणवत्तायादीत तिसरा आणि मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये सर्वप्रथम आलेला चि. बाबासाहेब दिवेकर या दोन्ही विद्यार्थ्यांचा गौरव महानिर्मितीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सुब्रत रथो यांचे शुभहस्ते करण्यात आला. श्री. रथो यांचे हस्ते रोख पारितोषिक – प्रशस्तीपत्रक व पुष्पगुच्छ देऊन दोन्ही विद्यार्थ्यांचे महानिर्मितीतर्फे कौतुक करण्यात आले.

चि. हर्षल चव्हाण यांचे पिता श्री. प्रकाश चव्हाण हे महानिर्मितीच्या मुंबई मुख्यालयात लेखाविभागात रोखपाल म्हणून कार्यरत आहेत, तसेच चि. बाबासाहेब दिवेकर यांचे पिता श्री. सुर्यभान दिवेकर हे महानिर्मितीच्या मुंबई मुख्यालयात मानव संसाधन विभागात आस्थापना अधीक्षक म्हणून कार्यरत आहेत.

सदर गुणगौरव समारंभास दोन्ही विद्यार्थ्यांचे कुटुंबिय तसेच महानिर्मितीचे संचालक (वित्त) श्री. गुलाबसिंग गिरासे, संचालक (संचलन) श्री. मधुकर शेलार, संचालक (प्रकल्प-प्रभारी) श्री. अरुण डवलेकर, कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री. अरविंद चौधरी, कार्यकारी संचालक (सं. व सु. १) श्री. चंद्रकांत थोटवे, तसेच महानिमिर्तीचे क्षेत्रीय कार्यालयातील मुख्य महाव्यवस्थापक, महाव्यवस्थापक व इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. याप्रसंगी सर्व उपस्थितांनी या दोन्ही विद्यार्थ्यांचे कौतुक करुन त्यांना भावी आयुष्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या.

---

प्रति, दिनांक : ०८.०६.२००९

**माननीय संपादक ,**
दैनिक

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत प्रसिद्ध करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**